# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वयेदाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००२०२४**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००२१४९**

**अपिलार्थी श्री. दामोदर भंडारी**
**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (मुंबई शहर)**
उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ,
नवीन प्रशासकीय इमारत,अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (मुंबई शहर)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०१.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०२.२०२१ | ०४.०५.२०२१ | १७.०३.२०२१ | १६.०४.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०७.२०२१ व २८.०६.२०२१ रोजीच्या दोन अर्जांन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि, श्री. वैभव गुहागरकर, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार-१ (विशेष कक्ष) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी त्यांचे पत्र दिनांक २९ डिसेंबर, २०२३ (प्राप्त दिनांक ०१ जानेवारी, २०२४) अन्वये आयोगास अन्य महत्वाचे प्रशासकीय काम असल्याने दोन्ही प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख मिळणेसाठी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करुन या दोन्ही प्रकरणावर सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : ०१.०१.२०२४**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००२०२४**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००२१४९**
**अपिलार्थी श्री. दामोदर भंडारी**

**सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४ (In continuation of order dt ०१.०१.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (अपिलार्थींची नोटीस पोस्टाने परत.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०७.२०२१ व दि. २८.०६.२०२१ रोजीच्या अर्जान्वये दोन द्वितीय अपील अर्ज दाखल केले आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे निवेदन दि. २५.०६.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. निवेदन सादर करुन त्यांनी असे सादर केले की, सदर दोन्हीही प्रकरणातील विषय हा अपील क्र. २१५०/२०२१ व २०२५/२०२१ मधील विषय एकसारखा आहे. अपील क्र. २१५०/२०२१ व २०२५/२०२१ मध्ये आयोगाने दि. १३.०६.२०२२ रोजी सुनावणी घेऊन दि. १५.०६.२०२२ रोजी अंतीम आदेश पारीत केलेले आहे.

ज्याअर्थी सदर दोन्हीही प्रकरणातील विषयासंबंधीत अपील क्र. २१५०/२०२१ व २०२५/२०२१ मध्ये अंतीम आदेश पारीत केलेले आहे. या कारणामुळे सदर दोन्हीही प्रकरणी कोणतेही आदेश अपेक्षित नाहीत.

**आदेश**

**सदर दोन्हीही अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.**

प्रदीप व्यास
२७-६-२०२४

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२४**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**